International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.4
Volume 6, Issue 2, Apr-June 2026 ID: IJCRTA000244 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# हिंगोली जिल्ह्यातील औंढा येथील नागनाथ मंदिर व पर्यटन

**पंडित कीर्ती नारायणराव, & प्रा. डॉ. जी. पी. भालेराव**

**Author Affiliation:**
* संशोधक विद्यार्थिनी, एम. ए. एम. एड सेट. इतिहास विभाग, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी.
** संशोधक मार्गदर्शक, इतिहास विभाग, तोष्णीवाल आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, सेनगाव, जि. हिंगोली.

**Citation of Article:** पंडित, के. एन.,& भालेराव, जी. पी. (2026). हिंगोली जिल्ह्यातील औंढा येथील नागनाथ मंदिर व पर्यटन. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 6 (2), pg. 38-46. ijcrta.org

**DOI: 10.5281/zenodo.20256876**

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्यात मराठवाडा विभाग आहे. मराठवाडा विभागात हिंगोली जिल्हा आहे जिल्हयात औंढा नागनाथ तालुका आहे.येथे महादेव या देवतेचे मंदिर आहे मंदिर हिंदू धर्मीयांसाठी पवित्र तीर्थक्षेत्र आहे.तसेच हे मंदिर शिवभक्तासाठी आस्थेचे ठिकाण आहे.

औंढा गाव हिंगोली शहरापासून 24 कि.मी. अंतरावर आहे. परभणी पासून 56 कि.मी. तर नांदेडपासून 64 कि.मी.अंतरावर आहे.

**मुख्य शब्द:** राष्ट्रीय संरक्षित स्मारक, हेमाडपंती शैली, शैव संप्रदाय, वैष्णव संप्रदाय, हरिहर मूर्ती.

**शोध निबंध-उद्दिष्ट्ये:**

१. हिंगोली जिल्हयाच्या पर्यटनाच्या दृष्टीने औंढा (ना.) तालुक्यातील नागनाथ मंदिराचा अभ्यास करणे.
२. नागनाथ मंदिराचे हिंगोली जिल्ह्याच्या दृष्टीने धार्मीक,सांस्कृतिक, ऐतिहासिक महत्त्व अभ्यासणे.

**गृहितके:**

१. हिंगोली जिल्ह्यात असलेले नागनाथ मंदिर पर्यटनाच्या दृष्टीने उत्कृष्ट कला स्थापत्य आहे.
२. औंढा नागनाथ तालुक्यातील नागनाथ मंदिराचे हिंगोली जिल्ह्याच्या धार्मिक, सांस्कृतिक ऐतिहासिक या सर्व बाबतीत महत्त्वाचे स्थान आहे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. संदर्भ संशोधन पध्दती स्विकारण्यात आली आहे. दुय्यम सामग्रीचा आधार या संशोधन कार्यासाठी घेण्यात आला आहे.संबधित संदर्भ ग्रंथातून माहिती मिळवण्यात आली आहे. वृत्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, पुस्तके, इंटरनेट इ.चा आधार घेण्यात आला आहे.

**राष्ट्रीय संरक्षित स्मारक :**

भारतीय पुरातत्त्व विभाग यामार्फत सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी काही विशिष्ट ऐतिहासिक वास्तु,इमारती ,स्मारके, जागा संरक्षित करतात.अशा स्थळांना 'राष्ट्रीय संरक्षित स्मारके' म्हणतात. अशा ठिकाणांचे व्यवस्थापन भारत सरकारचे पुरातत्व (Archaeological Survey of India)
खाते करते. इ.स.१९५१ या वर्षी भारत सरकारने घोषित केलेल्या स्मारकांसाठी ऐतिहासिक वास्तू व स्मारके जतन कायदा करण्यात आला आहे.

**हेमाडपंती शैली:**

हेमाडपंती शैली ही एक भारतीय स्थापत्यशैली आहे. देवगिरीच्या यादवांच्या राजवटीच्या काळात असलेले मुख्य प्रधान 'हेमाद्री पंडित अथवा हेमाडपंत' यांच्या नावावरुन या शैलीस ओळखतात या शैलीत तयार करण्यात आलेल्या मंदिरांना हेमाडपंती मंदिरे म्हणतात.

हेमाडपंती शैलीच्या मंदिराची बांधणी दगडांमध्ये,चुना किंवा इतर तत्सम प्रकाराच्या वस्तू भरत नसून दगडांना खाचा देऊन एकत्र करतात. मंदिर वास्तु शिखरापर्यंत ही दगड एकत्र करण्यात आलेली रचना एकसंध आणि टिकाऊ असते. यास हेमाडपंती शैली म्हणतात.

**शैव संप्रदाय:**

शिव महादेव, शंकर या देवतेची प्रार्थना करणारा व त्यांच्यावर आस्था असणारा संप्रदाय शैव संप्रदाय आहे.

**वैष्णव संप्रदाय:**

विष्णु या देवतेस मानणारा व त्यांच्या अवतारांवर आस्था असणारा संप्रदाय वैष्णव संप्रदाय होय.

**हरिहर मूर्ती:**

हिंदू धर्मात विष्णु हरी व शिव हर या देवतांच्या संयुक्त स्वरुपास 'हरिहर' म्हणतात. विष्णु आणि शिव या दोन्ही देवतांच्या संयुक्त स्वरुपातील मूर्तीना हरिहर मूर्ती म्हणतात. हरिहर स्वरुप वैष्णव संप्रदाय व शैव संप्रदाय या दोन्हीमध्ये पुजनीय आहे.

हिंगोली जिल्ह्यातील नागनाथ मंदिर महाराष्ट्रातील प्राचीन संस्थान आहे.आधी मंदिरासाठी गावातील पंचमंडळ कार्य करत असे.त्या त्या काळात या भूप्रदेशावर ज्यांचे राज्य होते ते पंचमंडाळास मंदिर व्यवस्था निधी देत असत. पुढील काळात स्वातंत्र्य मिळाल्यावर मंदिर व धार्मीक संस्थाने यासाठी विश्वस्त अधिनियम लागला त्या नियमानुसार विश्वस्त मंडाळामार्फत कारभार करण्यात येवु लागला.

औंढा नागनाथ मंदिर वास्तू व परिसर शासनाने इ.स.१९६४ पासून संरक्षित वास्तू म्हणून घोषित केले.इ.स १९७२ पासून श्री नागनाथ मंदिर वास्तू महाराष्ट्र शासनाने पुरातत्त्व खात्याकडे दिली. पुराण वास्तू संशोधन खाते या प्राचीन वास्तुची पाहणी दर्जा दिला आहे. पर्यटन स्थळ म्हणून घोषित केले आहे. महाराष्ट्र राज्य पर्यटन मंडळाने पर्यटक निवास येथे बांधले आहे देशी विदेशी पर्यटकांसाठी सुविधा दिल्या आहेत.

**पर्यटन :**

पर्यटन ही संज्ञा 'प्रवास' या शब्दाशी संबंधित आहे. 'Tour' हा शब्द यासाठी योजतात Tour हा शब्द 'Tornos'. या लॅटिन भाषेतुन आला आहे. Tornos शब्दाचा मूळत: अर्थ वर्तुळ असा होतो. या शब्दापासून पुढील काळात 'वर्तुळाकार प्रवास' असा शब्द रुढ झाला.

**व्याख्या:**

"एका व्यक्तिने,समुदायाने एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासाठी कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय." अशी पर्यटनाची व्याख्या करण्यात येते. पर्यटनाचे ऐतिहासिक पर्यटन, धार्मीक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन असे विविध प्रकार आहेत.

जगात पर्यटनाला आज खूप महत्त्व मिळाले आहे याची पार्श्वभूमी मध्ययुगीन काळात ख्रिश्चन बुद्धिझम परंपरांनी आपल्या धार्मिक यात्रांना जास्त गती दिली त्यांनी या यात्रांवर आधारित ग्रंथ निर्माण केले त्यांची प्रवास वर्णने जगाला वाचायला मिळू लागली चीन देशातील प्रवासी जगातील इतर देशातील प्रवास करणारे लोक आपले अनुभव लिहू लागले त्यांच्या या अनुभवामुळे जगाविषयी लोकांना जिज्ञासा निर्माण होऊ लागली पर्यटन करण्यास उत्सुकता वाढू लागली ही वस्तुस्थिती आहे पुढील काळात जगभरात ग्रँड टूर्स सुरू झाले त्यानंतर पर्यटन क्षेत्रात क्रांती होण्यास सुरू झाली रोमन समुदायाने प्रवासाला आनंदाचे साधन केले तर ग्रीक इजिप्त या प्रदेशामध्ये याचे प्रचलन वाढले औद्योगिक क्रांतीने पर्यटनाला आणखीन चालना दिली विविध देशात पर्यटन मोठ्या प्रमाणात सुरू झाले या सर्वांमुळे पर्यटनाला खूप बळकटी मिळाली.

मनुष्यास जग पाहण्याची उत्सुकता निर्माण झाली त्यामुळे पूर्वापार चालत आलेल्या प्रवास उद्देशांसह व नियोजन करून होऊ लागला तेव्हा त्यास पर्यटन म्हणण्यात येऊ लागले आजच्या जगात पर्यटन खूप व्यापक झाले आहे जगाच्या कोणत्याही देशाच्या समाजाच्या जडणघडणीतली महत्त्वाची संज्ञा पर्यटन झाली आहे पर्यटनातून सांस्कृतिक विचार प्रथा परंपरा यांचे आदान प्रदान होते अर्थकारण मजबूत होते.

पुढील काळातील शाश्वत समाज निर्मितीची ताकद पर्यटनात आहे सांस्कृतिक वारसा प्रत्येक देशात असतो ते पाहण्यासाठी अभ्यासण्यासाठी पर्यटन घडते पर्यटन जगातील लोकांमध्ये ऐक्य निर्माण करू शकते पर्यटनाच्या माध्यमातून जगातील इतिहास संस्कृती विविध स्थळे समजून घेता येतात. इ.स. 1980 मध्ये पर्यटनाची जागतिक परिषद आयोजित करण्यात आली ही परिषद पर्यटनाचे जागतिक पातळीवर महत्त्व स्पष्ट करणारी ही परिषद ठरली देशांच्या विकासाला सहाय्यक असणारी पर्यटन ही महत्त्वाची बाब आहे याचे कारण देशाच्या सांस्कृतिक सामाजिक आर्थिक शैक्षणिक क्षेत्र इत्यादी सर्व क्षेत्रावर पर्यटनाचा प्रभाव होतो आंतरराष्ट्रीय स्तरावर देशांमधील परस्पर असणारे सामंजस्य वाढण्यास पर्यटनामुळे मदत होते इ.स. 1991 मध्ये ओटावा येथे जागतिक पर्यटन परिषदेत पर्यटन व्याख्या निश्चित करण्यात आली.

"एक वर्ष किंवा त्याहून कमी काळ इतर वातावरण प्रदेशात आनंद मनोरंजन किंवा इतर कारणांसाठी प्रवास व वास्तव्य करणाऱ्या व्यक्तीची कृती पर्यटन मानण्यात आली". पर्यटन क्षेत्राला 18 व्या शतकापासून वेग मिळाला कारण जगात अनेक देशांमध्ये दळणवळणाची विविध साधने निर्माण झाली ब्रिटन इटली फ्रान्स या देशामधील कलाकार लेखक, इतिहासकार पर्यटन करण्यासाठी विविध खंडांमध्ये प्रवास करू लागले होते आनंदासाठी प्रवास ही संज्ञा सर्वात आधी स्वीकारणारे रोमन होते. सुबक बोटी घोड्यांच्या गाड्या यामधून त्यांनी प्रवासाला सुरुवात केली याचा उद्देश मुख्यत्व देवदर्शन होते सर्व जगातील पर्यटनाचा मुख्यत्वे धार्मिक पर्यटन हा उद्देश मानण्यात येतो. मध्ययुगापर्यंत पर्यटन प्रवास याचे

मुख्य प्रस्थ खूप वाढले साहित्य संगीत तत्वज्ञान यांचा प्रवास सर्वत्र सुरू झाला. पोर्तुगीज प्रवासी बार्थो-लोमी, दियास वास्को-द-गामा यांच्यामुळे पर्यटनासाठी लोकांची संख्या वाढली.

भारत देशाची व्याप्ती खूप मोठी आहे खंडप्राय भारत देशात 'तीर्थाटन' पर्यटनाची पूर्व पिठीका ठरते यामध्ये देशातील चारधाम, कुलदैवतांचे दर्शन, पवित्र नद्यांची परिक्रमा इत्यादी कारणाने पर्यटन सुरू झाले.

**जागतिक स्तरावरील पर्यटन संज्ञेचे महत्त्व:**

पर्यटनाला आधुनिक युगात जागतिक स्तरावर खूप महत्त्व मिळाले आहे जागतिकीकरण आणि पर्यटन हे परस्परांशी संबंधित बाबी आहेत असे म्हणता येते जागतिक संस्कृती परंपरा वैचारिक प्रवाह यांना पर्यटनामुळे समजून घेणे शक्य झाले आहे यामुळे आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण झाले आहे आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक सामंजस्य देखील वाढीस सहाय्य मिळते. यामधून पर्यटनाला जागतिक रूप देण्यासाठी जागतिक स्तरावर विविध संघटना संस्था उदयाला आल्या त्यामुळे संयोजन नियोजन नियंत्रणाचे कार्य सुरू झाले. पर्यटकांमुळे स्थानिक अर्थकारण वाढते त्यामुळे स्थानिक आर्थिक स्थिती मजबूत होण्यास मदत होते.

**सांस्कृतिक प्रभाव:**

सांस्कृतिक परंपरा ऐतिहासिक स्थळ प्राचीन वास्तू यांच्या संवर्धनासाठी पर्यटनाचा उपयोग जास्त आहे अनेक ऐतिहासिक वास्तू यांचे संवर्धन सुरू झाले प्राचीन परंपरा लोककला यांचे पुर्नविनीकरण झाले पर्यटन करणारा पर्यटक जगभर पर्यटन करताना तेथील इतिहास, संस्कृती, परंपरा यांचा अभ्यास करतात माहिती घेतात त्यांना त्या ठिकाणचे परंपरा पाहायची असतात त्यामधून संवर्धन कार्य होते. पर्यटकाकडून ऐतिहासिक किंवा वारसा स्थळांना भेटी देण्यासाठी शुल्क घेण्यात येते याचा उपयोग वास्तूंच्या संवर्धनासाठी होतो म्हणजेच पर्यटनामुळे सांस्कृतिक संवर्धनासाठी पुरेसा निधी मिळतो.

**नैसर्गिक संसाधने व पर्यटन:**

नैसर्गिक संसाधने परिसंस्था यांचे संवर्धन पर्यटनातून होते पर्यटनासाठी संरक्षित उदयाने इतर नैसर्गिक साधनांचे संवर्धन हे प्रशासनाचे कर्तव्य बनते. यामधून ही संपत्तीचे संवर्धन होते. पर्यटकांसाठी संसाधने निर्मिती केल्याने त्याचा उपयोग स्थानिकांना होतो. शिक्षण दर्जावर अनुकूल प्रभाव होतो. पर्यटनामुळे सांस्कृतिक देवाणघेवाण होत असल्याने जगभर सांस्कृतिक विविधता अनुभवास मिळते.

**पर्यटन क्षेत्र विकास:**

इ.स. 1963 मध्ये युनायटेड नेशन्स ने रोममध्ये आंतरराष्ट्रीय प्रवास पर्यटन यावर परिषद आयोजित केली होती. परिषदेत मोठ्या प्रमाणात पर्यटन क्षेत्रावर चर्चा झाली जगात पर्यटनाला खूप महत्त्व असल्याचे या परिषदेत नमूद करण्यात आले. या परिषदेनंतर अनेक संज्ञा विविध घटक पर्यटन संज्ञेत समाविष्ट झाले. जागतिक स्तरावर पर्यटन धोरण आखणी अमंलबजावणी या दृष्टीने भक्कमता पर्यटन क्षेत्राला मिळाली.

**भारत देशात पर्यटन विकास:**

भारत देशात पर्यटन विकास खऱ्या अर्थाने इ.स. 1946 मध्ये सुरू झाला. सर जॉन सार्जंट कमिटीच्या माध्यमातून ब्रिटिश सरकारने पर्यटन वाढीसाठी किमीटीची स्थापना केली. भारतात पर्यटन क्षेत्रासाठी व्यापक सर्वेक्षण करण्यात आले. ब्रिटिश सरकार समोर सर्वेक्षण अहवाल सादर करण्यात आला. या अहवालात ऐतिहासिक समृद्ध व नैसर्गिक ठिकाणे विविधतेची भारतात असणारी संख्या मोठी आहे. ही बाब या अहवालात मांडण्यात आली तसेच पर्यटन विकासासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याची शिफारस ही करण्यात आली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत देशात देशातील समृद्ध निसर्ग ऐतिहासिक ठिकाण जागतिक पातळीच्या लेणी, वास्तु, मूर्ती, मंदिरे या सर्वांचा आढावा पुन्हा नव्याने घेण्यात आला व इ.स. 1966 मध्ये 'भारत पर्यटन विकास महामंडळ' याची स्थापना करण्यात आली. तसेच भारतात 'भारत सरकार पर्यटन मंत्रालय' स्थापन करण्यात आले याद्वारे देशातील पर्यटन स्थळे, प्रचार प्रसार, पर्यटन सेवा विविध योजना माध्यमात पर्यटन क्षेत्रातील अर्थकारणातला गती नियोजनासोबत, पर्यटन मानले, नियमावली निश्चित करणे पर्यटन क्षेत्रात संशोधन निरीक्षण, समन्वय पर्यटन क्षेत्राचा सर्वांगीण आढावा पर्यटकांना माहिती देण्यासाठी विविध साधनांची निर्मिती, पर्यटन क्षेत्रातील विविध घटकांचे नियमन, संमेलने इत्यादी कार्य या मंत्रालयामार्फत होतात.

**भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग:**

पर्यटन संज्ञेत अनेक बाबींना महत्त्व आहे. पर्यटन क्षेत्राशी संबंधित अनेक शासकीय यंत्रणा असतात. त्यातील पुरातत्त्व खाते हे महत्त्वाचे खाते आहे. या माध्यमातून ऐतिहासिक प्राचीन स्मारके वास्तू यांचे संवर्धन करण्यात येते. यामुळे याला खूप महत्त्व आहे.

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाद्वारे या खात्याचे संचालन होते प्राचीन स्मारकांचे स्थळांचे तेथील ठिकाणी मिळणाऱ्या अवशेषांचे संशोधन जतन संवर्धन पुर्निर्माण सभोवतालचे सौंदर्यीकिकरण असे अनेक प्रकारचे अनेक कार्य या खात्याच्या माध्यमातून होते प्रत्येक राज्यात याप्रमाणे पुरातत्त्व विभाग असतो. त्यामुळे भारतातील काही प्राचीन स्मारके केंद्रीय पुरातत्व विभाग अंतर्गत आहेत तर काही राज्याच्या आखत्यारीत येतील, देशाच्या महत्त्वाच्या स्थळाचा यात समावेश होतो. भारतात पुरातत्व सर्वेक्षण विभागाची स्थापना इ.स. 1861 मध्ये झाली पर्यटनाच्या दृष्टीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग महत्त्वाचे आहे.

**भारतातील महत्त्वाचे सांस्कृतिक कला महोत्सव:**

भारत देश वैविध्याने परिपूर्ण आहे. विविध परंपरा, प्रथा, सांस्कृतिक मूल्ये येथे आहेत. प्रत्येक संस्कृतीत त्यांचे स्वरूप सण, उत्सव यांच्यातून प्रकट होतात पर्यटकांना अशा महोत्सवाचे आकर्षण असते. पारंपारिक रूप सणांना येणारे महोत्सवी स्वरूप विशिष्ट प्रदेशांचे महोत्सव लिटरेचर फेस्टिवल यांच्या समावेश यामध्ये होतो. तसेच दर बारा वर्षांनी नियमित होणारा प्रयागराज चा कुंभमेळा, जगन्नाथ पुरीची रथयात्रा, पंढरपूरची आषाढी वारी, कार्तिक यात्रा इत्यादी महोत्सव महत्त्वाचे आहेत.

**विविध महोत्सव:**

भारत देशातील विविध राज्यात विविध महोत्सवांची परंपरा आहे. केरळ राज्यात श्रावणात उत्सव असतो चार-पाच दिवस हा उत्सव असतो फुलांची सजावट रांगोळ्या संगीत यावेळी होते. बोट रेस ही पर्यटकांसाठी आकर्षण आहे राज्यात येथे विविध सांस्कृतिक महोत्सव होते. जैसलमेर येथे रंगतदार उत्सव महिनाभर होतो. पारंपारिक राजस्थानी उंट यात्रांचा मेळा असतो 'पुष्कर मेळा' जगभरात प्रसिद्ध आहे उंटांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश होतो.

पुष्कर मेळयास जत्रेचे स्वरूप असते. गोव्याचे कॉर्निव्हल गोव्यात कायम उत्साही वातावरण असते. ख्रिसमसचा काळ अधिक उत्सव असतो. जगन्नाथ पुरी यात्रा ही खूप महत्त्वाची असते. लोक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित राहतात दरवर्षी भव्य रथ तयार करून त्यातून जगन्नाथाची यात्रा काढण्यात येते आषाढ महिन्यात हा उत्सव असतो.

**महाराष्ट्र राज्यातील महोत्सव:**

महाराष्ट्र राज्यात ही अनेक उत्सव पर्यटनासाठी होतात छत्रपती संभाजी नगर (पूर्वीचा औरंगाबाद जिल्हा) वेरूळ अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सव असतो. कृष्ण जन्माष्टमी निमित्त दहीहंडी उत्सव संपूर्ण राज्यात होतात. नाशिकमध्ये दर 12 वर्षांनी कुंभमेळा होतो. पंढरपूरची आषाढीची वारी हा महाराष्ट्रातील सर्वात लक्षनीय उत्सव असतो जगभरातून पर्यटक भाविक या यात्रेत सामील होतात.

**भारतातील महत्त्वाची पर्यटन स्थळे:**

भारतात विविध प्रमुख व महत्त्वाची पर्यटन स्थळे आहेत. राजघाट, कुतुब मिनार, , फत्तेपूर सिक्री, जयपूर, एलोरा केवेज, वेरूळ लेणी जागतिक वारसा लाभलेल्या लेणींचा संग्रह आहे. जगभरातील पर्यटक या लेण्या येथील मूर्तींचे वैविध्य पाहण्यासाठी येतात.

पूर्वी फार पूर्वी प्राचीन काळात पर्यटन ही संज्ञा 'प्रवास' या शब्दापर्यंत होती. आता आधुनिकता आल्याने पर्यटन संज्ञा विस्तारली आहे. भारत देशात तीर्थयात्रा करण्याने भारतीयांची पर्यटनाची व्याख्या व संज्ञा सूरू झाली देवीदेवतांच्या दर्शनाने तीर्थटन होते. यामधील तीर्थक्षेत्र मोठ्या प्रमाणात भारतात, महाराष्ट्रात, मराठवाडयात आहेत. हिंगोली जिल्ह्यात असलेले औंढा तालुक्यातील नागनाथ मंदिर पर्यटनासाठी, तीर्थटनासाठी महत्त्वाचे क्षेत्र आहे.

**नागनाथ मंदिर स्थापना - कथा:**

नागनाथ मंदिर स्थापनेविषयी वर्षानुवर्षे अनेक कथा सांगण्यात येतात. एका कथेनुसार मंदिरातील शिवपिंडीची स्थापना पांडवांपैकी युधिष्ठराने केली असे सांगतात. ही स्थापना जेव्हा औंढा हे क्षेत्र 'आमर्दकपूर' क्षेत्र म्हणून ओळखण्यात येत असे. तेव्हा करण्यात आली असे कथेत सांगतात पांडवकालीन संदर्भ मंदिराला आहे. तसेच 13 व्या शतकातील देवगिरीच्या यादवांच्या काळातील मंदिर आहे असे सांगतात मंदिराच्या वरील भागाचे बांधकाम अहिल्याबाई होळकर यांनी केले आहे.

यावरून मंदिराची ऐतिहासिकता स्पष्ट होते. मंदिराविषयी आख्यायिका संत नामदेव विषयीची सांगतात. वारकरी संप्रदायातील संत नामदेव या आपल्या भक्ताचे अभंग ऐकण्यासाठी देवाने मंदिर फिरवले. अशी ही कथा आहे.

या सर्व कथा औंढा नागनाथ मंदिराविषयी वर्षानुवर्षे सांगण्यात येतात.धार्मीकदृष्ट्या या सर्व कथा महत्त्वाच्या आहेत व आस्थेशी संबंधित आहेत.

**नागनाथ मंदिर स्थापत्य रचना:**

नागनाथ मंदिर स्थापत्य भव्य आकाराचे आहे. या मंदिराचे क्षेत्रफळ 66.9.60 मी. (72,000 चौ. फुट) आहे. मंदिराचे क्षेत्रफळ एकुण एवढे भव्य व विशाल आहे. परंतु मंदिर पाया हेमाडपंती शैलीचा आहे.

मंदिर परिसरात 12 लहान मंदिरे आहेत. 68 तीर्थ आहेत मंदिर निसर्गरम्य परिसरात आहे. बालाघाट डोंगररांगात नागनाथ मंदिर आहे.

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.4
Volume 6, Issue 2, Apr-June 2026 ID: IJCRTA000244 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

**मंदिर विविध मुर्तीचे अंकन:**

औंढा नागनाथ मंदिराच्या आतील व बाहेरील बाजूस अतिशय सुंदर सुबक व विविध मूर्तीचे अंकन मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. यातील बहुतांश मूर्ती मुख्य आराध्यदैवत असलेल्या 'महादेव' या देवतेच्या आहेत. या मूर्तीमध्ये महादेव-देवी पार्वती, कार्तिकेय, गणपती, द्वादशमुखी शिव, भैरवमूर्ती, महाकाली, चामुंड, हरगौरी इ. शैव संप्रदायाशी संबंधीत मूर्तीचे अंकन करण्यात आले आहे. शिव संप्रदाय शिवाला विश्वाचा निर्माता मानतो. त्याप्रमाणे वैष्णव संप्रदाय जो 'विष्णु' या देवतेस विश्वासाच्या निर्माता मानतो. औंढा नागनाथ येथील मंदिरावर वैष्णव संप्रदायाशी संबंधित मूर्ती करण्यात आल्या आहेत. विष्णु देवतेच्या अवताराशी संबधीत मूर्तीही येथे आहेत विष्णू, मधूमुकूटभारी, मूरलीधर मूर्ती इ. मूर्ती येथे अंकित आहेत. येथे हरिहर मूर्ती ही आहेत. यामध्ये 'हरि' म्हणजे विष्णु देवता तर हर म्हणजे 'शिव' ही देवता आहे. या दोन्ही देवतांच्या एकत्रित मूर्तीना हरिहर मूर्ती म्हणतात. या मूर्तीमधील उजवीकडील भाग शिव देवतेचा असतो. महादेवाच्या हातात डमरु,त्रिशुल ही आयुधे असतात. नंदी हे महादेवाचे वाहन,ही असते. तर डावीकडील भाग 'विष्णु' देवतेचा असतो. विष्णु देवतेच्या हातात.शंख, चक्र असून गरुड वाहन असते.अशी विशेष प्रकारची हरिहर मूर्ती शैव व वैष्णव संप्रदायांना पुजनीय आहेत.तर इतिहास संशोधक, मूर्तीशास्त्रज्ञ उत्सुकता व अभ्यासाचा विषय आहेत. पर्यटकांसाठी या मूर्ती जिज्ञासेचा विषय आहे.

**ऐतिहासिक पर्यटन व नागनाथ मंदिर:**

ऐतिहासिक पर्यटन हा पर्यटन प्रकार आहे.विशिष्ट ऐतिहासिक स्थळे, वास्तु, किल्ले,मंदिर, राजवाडे, स्मारके यांच्या इतिहासाचा अभ्यास व अनुभव घेण्यासाठी भेट देण्यात येते. ऐतिहासिक पर्यटनाला 'Heritage Tourism' असे इंग्रजीत म्हणतात. ऐतिहासिक स्थळ ऐतिहासिक पर्यटनाशी संबंधित असतात जी स्थळे ऐतिहासिक राजवट सांस्कृतिक विकास धार्मीक कार्याशी संबंधित असतात. मानवाच्या सांस्कृतिक विकासाशी संबधित असतात.

यादृष्टीने नागनाथ मंदिर ऐतिहासिक पर्यटन करण्यासाठी उत्कृष्ट नमूना आहे. हा ऐतिहासिक वारसा आहे; 13 व्या शतकातील मंदिर यादव कालीन आहे. ऐतिहासिक वारसा मिळालेला आहे. इतिहासाच्या व ऐतिहासिक पर्यटनासाठी हे महत्त्वाचे मंदिर आहे.

**धार्मिक पर्यटन व नागनाथ मंदिर:**

ऐतिहासिक पर्यटनाप्रमाणे धार्मिक पर्यटन हा ही एक पर्यटन प्रकार आहे धार्मिक स्थळावर धार्मिक उद्देशाने करण्यात येणाऱ्या पर्यटनाला धार्मिक पर्यटन म्हणतात विविध धर्मांचे लोक राहत असलेल्या भारत देशात धार्मिक पर्यटन जास्त प्रमाणात होते विविध धर्मातील यात्रा, जत्रा धार्मिक स्थळावर होणारे सण, उत्सव, महोत्सव यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम होत असतात मोठ्या संख्येने लोक या कार्यक्रमांमध्ये भक्तीने व आस्थेने सामील होतात तेव्हा धार्मिक पर्यटन मोठ्या प्रमाणात होते नागनाथ मंदिर तर धार्मिक आस्थेचे स्थळ आहे. लाखो हजारो लोक धार्मिक पर्यटनासाठी येथील उत्सवात सामील होण्यासाठी येथे येतात धार्मिक पर्यटन करण्यासाठी हिंदू धर्मीयाप्रमाणे शीख धर्मीय भाविक भक्त मोठ्या प्रमाणात मंदिरात येतात शिख धर्मीय संत नामदेवांना खूप मानतात त्यांच्या आस्थेमुळे शीख धर्मीय पर्यटक भाविक खूप संख्येने येथे दर्शनासाठी येतात. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने भारतातील नागनाथ मंदिर खूप महत्त्वपूर्ण तीर्थक्षेत्र आहे.

**सांस्कृतिक पर्यटन व नागनाथ मंदिर:**

ऐतिहासिक धार्मिक पर्यटनाप्रमाणे सांस्कृतिक पर्यटन हा महत्त्वाचा पर्यटन प्रकार आहे सांस्कृतिक आदान प्रदान होण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक पर्यटन सहाय्यक असते पर्यटन सामाजिक घटकावर अनुकूल प्रकारचा प्रभाव करते. काही प्रभाव दृश्य असतात सकारात्मक असतात पर्यटन स्थळाच्या अस्तित्वाने पर्यटक येतात तेव्हा सुविधा देणारे सेवाक्षेत्र येते. अनेक भागात पर्यटन वाढीस लागते पर्यटनामुळे जागतिक स्तरावर सामंजस्य सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होते. विविध देशांचे पर्यटक इतर देशात पर्यटन करतात तेव्हा पर्यटकांची यजमान देशासोबतच पर्यटकांच्या मूळ निवासी देशांची ही जाणीव असते दोन्ही देशात परस्पर सामंजस्य यामुळे निर्माण होते.

सांस्कृतिक पर्यटनात स्थानिक लोक यांच्या परंपरा चालीरीती, प्रथा, जीवनशैली यांची माहिती पर्यटकास होते. सांस्कृतिक घटकांचा प्रभाव स्पष्ट जाणवणारा असतो पर्यटक जेव्हा एखाद्या ठिकाणी पर्यटन करतो तेव्हा तेथील संस्कृतीच्या सहवासात येतो व आपल्या स्वतःच्या संस्कृतीनुसार वावरतो यामुळे सांस्कृतिक देवाण-घेवाण होत असते.

परंपरा इतर ठिकाणी प्रसारित होतात महाराष्ट्रात ‘छटपूजन’ करण्याची प्रथा नव्हती पण उत्तर भारतातील नागरिकांच्या महाराष्ट्रात येण्याने महाराष्ट्रातही हे पूजन दिसते. पर्यटन करण्याने सांस्कृतिक मूल्यांची जोपासना होत असते. एखाद्या प्रदेशातील संस्कृती, परंपरा यांचे प्रदर्शन सांस्कृतिक पर्यटनात करण्यात येते.

**सांस्कृतिक पर्यटन सकारात्मक प्रभाव:**

सांस्कृतिक पर्यटनाने स्थानिक संस्कृती मूल्यांचे संवर्धन साधण्यात येते सांस्कृतिक ऐतिहासिक वारसा संवर्धन करण्यासाठी पर्यटकांमुळे प्रोत्साहन मिळते तसेच अर्थसाह्य ही मिळते. परंपरा, प्रथा यांचे पुनरुज्जीवन करणे शक्य असते कारण स्थानिक परंपरा पर्यटकांसाठी नवीन असतात पर्यटकांसाठी ते आकर्षण असतात. पर्यटन स्थळावर असलेल्या मूर्ती, लेणी यामुळे सांस्कृतिक घटक पर्यटकांना समजतात धार्मिक परंपरा, गायन वादन, रूढी यांचा परिचय धार्मिक स्थळाला भेट दिल्याने होतो पर्यटकांना स्थानिक परंपरा रुढी, धार्मिक विधी, आस्था यांची माहिती होते.

याबाबतीत नागनाथ मंदिर वैविध्यपूर्ण विधी धार्मिक कार्यक्रम पूजन उत्सव यासाठी ओळखण्यात येते. नागनाथ मंदिरातील ‘महाशिवरात्र’ रथयात्रा विशेष महत्त्वाचे व आकर्षण असते. महाशिवरात्र येथील सर्वात मोठा उत्सव असतो. हा उत्सव फाल्गुन वैद्य चतुर्दशिस असतो यावेळी विशेष अभिषेक करण्यात येतो. विशेष पूजा होते कीर्तन असते मंदिराला रोषणाई करतात. सुंदर विद्युत रोषणाई मंदिराला करण्यात येते. त्यामुळे नागनाथ मंदिर अधिकच सुंदर दिसते महाशिवरात्र हा उत्सव महत्त्वपूर्ण असल्याने लाखो भावी भक्त दर्शन घेण्यासाठी येथे येतात. येथे यावेळी मोठी रथयात्रा भरते. यात्रेचे स्वरूप खूप मोठे असते. रथोत्सवात रथामध्ये नागनाथ प्रतिमा विराजमान करून प्रदक्षिणा करण्यात येतात. पाच प्रदक्षिणा करतात. या यात्रेमध्ये परिसरातील इतर जिल्ह्यातील लोक उत्साहाने सामील होतात. यात्रेत आनंद, उत्साह, करण्याची साधने असतात. लोकांच्या धार्मिक सामाजिक सांस्कृतिक या सर्वांच्या बाबतीत ही यात्रा खूपच महत्त्वाचे असते.

श्रावण महिना भक्तांसाठी महत्त्वाचा असतो. हजारोंच्या संख्येने भाविक कावडीने पवित्र जल अर्पण करतात. यासाठी ते पायी यात्रा करतात. नागनाथ मंदिरामध्ये विजयादशमी या उत्साहावेळी मिरवणूक असते. यातही भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात. धार्मिक दृष्टीने हे उत्सव भाविकांसाठी आस्थेचे असतात. इतर ठिकाणाहून आलेल्या पर्यटकांसाठी यावेळी सांस्कृतिक पर्यटन मोठ्या प्रमाणात होते. सांस्कृतिक पर्यटनासाठी नागनाथ मंदिर महत्त्वाचे पवित्र स्थळ आहे.

**निष्कर्ष :**

हिंगोली जिल्ह्यात असलेले औंढा नागनाथ तालुक्यातील 'नागनाथ' मंदिर पवित्र तीर्थक्षेत्र आहे ऐतिहासिकता, सुंदर स्थापत्यशास्त्र असून उत्कृष्ट मूर्तीचे अंकन करण्यात आलेले नागनाथ मंदिर आहे. धार्मिक सांस्कृतिक या सर्वांचा मेळ या मंदिरामध्ये साधण्यात आलेला आहे. हजारो वर्षांचा इतिहास नागनाथ मंदिराला लाभलेला आहे. पांडव काळाचे संदर्भ असलेले हे नागनाथ मंदिर आहे. तेराव्या शतकातील यादवांची राजवट असलेले नागनाथ मंदिर भव्य आहे मंदिर निसर्ग रम्य परिसरात आहे. येथील पर्वतरांगा मंदिराच्या समृद्धतेत अधिक भर देतात विविध धार्मिक सांस्कृतिक परंपरांचे अखंड प्रथा नागनाथ मंदिरात येथील 'महाशिवरात्री' होणारा उत्सव, रथोत्सव, रथयात्रा या माध्यमातून आजही कायम आहे.

भव्य आकाराचे मंदिर स्थापत्य, विविध मूर्तीचे अंकन यामुळे पर्यटक इतिहास संशोधक भक्तगण या सर्वांसाठीच नागनाथ मंदिर आश्चर्याचे भक्तीचे पर्यटन स्थळ आहे. हिंगोली जिल्ह्यात असलेले नागनाथ मंदिर राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून मंदिर भारत देश, महाराष्ट्र राज्य व मराठवाडा प्रदेश या सर्वांच्या बाबतीत अतिशय आस्थेचे मूर्तिशास्त्र स्थापत्याच्या बाबतीत अतिशय उत्कृष्ट असे पर्यटनाचे ठिकाण आहे जे हिंगोली जिल्ह्याच्या सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक व पर्यटन या सर्व बाबतीत महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1) अर्धापुरकर, औंढा नागनाथ, पवन प्रकाशन परभणी
2) साने र. य., महाराष्ट्र पर्यटन कोश, विद्या विकास मंडळ, नागपूर
3) प्रा. टाकळकर शरयू, टाकळकर सारंग आधुनिक पर्यटन शास्त्र विद्या बुक्स पब्लिशर्स
4) District Census Handbook XII A, Village and town directory, Hingoli 2011.
5) पर्यटन विशेष, साप्ताहिक सकाळ
6) aundhanagnath.in
7) India.gov.in
8) Mr.wikipedia.org
9) marathwadatourism.com
10) igi.global.com
11) hi.wikipedia.org/https://hi.wikipedia.org
12) दै. लोकमत